# सरकार - सहकार - कायदे - संविधान

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा सहकार कायदा, दि मल्टीस्टेट को - ऑप सोसायटी ॲक्ट १९८४ आणि The Representation of the People Act, 1950 हे तिन्ही कायदे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लागू झालेल्या **भारताच्या संविधानाबरोबर** एकत्र वाचले व अभ्यासले तर, सरकार हे कायदे पाळत नाहीत हेच आपल्या लक्षात येईल. किंबहुना सरकार संविधानाशी प्रतारणा करून स्वतः बनविलेल्या कायद्याशी विसंगत व जनतेच्या विरोधात काम करते हेच लक्षात येईल. १ टक्का सुध्दा लोक सरकारच्या बेकायदेशीर कृतीबद्दल न्यायालयाकडे दाद मागत नाहीत. **सरकारच्या विरोधात कोण लढण्यासाठी पैसे कोण देणार? परिणाम कोण भोगणार? व आपल्या पाठिशी कोण उभे राहणार?** ह्या सर्वसाधारण व रूढ झालेल्या मानसिकतेमुळे सरकार वारंवार कायदा हातात घेवून जनतेकडून विविध मार्गाने वसुल केलेल्या महसुल रक्कमेची बेसुमार विल्हेवाट लावीत आहे. व **असे कारण्याचा मुळ हेतु हा केवळ पैसाच आहे,** यापेक्षा वेगळे काहीही नाही.

महाराष्ट्र सरकारचा **कॅग** अहवाल जर वाचला, तर सरकार चालविणारे व सरकारला विरोध करणारे दोन्हीही **लोक प्रतिनिधी** यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करून जर तपास केला, तर अनेकांना जन्मठेपेची शिक्षा लागेल असे महाभयंकर आर्थिक घोटाळे पध्दतशीरपणे संगनमताने राज्यात सर्वत्र झालेले आहेत. ज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व स्वतः सरकारचे सर्व अंगीकृत कारभार करणाऱ्या योजनांमध्ये कायदा हातात घेवून राजरोसपणे हजारो करोड रूपयांची लूट संबंधितांनी केलेली आहे. '' कॅग '' म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक व्यवहाराची ऑडीट करणारी भारत सरकारची यंत्रणा होय. परंतु ह्या '' कॅग '' अहवालावरुन चौकशीची मागणी करून संबंधितांवर भारतीय दंडसंहिता **( I. P. C.)** खाली गुन्हे दाखल करण्याची आणि **C. B. I.** कडे ही प्रकरणे सादर करण्याची हिम्मत विरोधी पक्ष जाणीवपुर्वक दाखवित नाहीत, हेच आपल्या लक्षात येईल.

प्रत्येक जण मग तो सत्तेत असो किंवा विरोधात असो, आपापल्या स्तरावर कायदा हातात घेण्याचे काम सत्ता आणि पैशाच्या जोरावर करीत असल्याचे चित्र राज्यात सर्वत्र दिसते. ताजेच उदाहरण जर द्यावयाचे असेत तर ''**ज्या लोकप्रतिनिधिंना मुंबईत स्वतःचे घर आहे त्यांनी सुध्दा, म्हाडाकडे घर** मिळणेसाठी अर्ज केले आहेत. आणि खास बाब म्हणून कायदा हातात घेवून करोडो रूपयांच्या किमतीची घरे स्वमालकीची अल्पकिमतीत करून घेण्याचे सर्व सोपस्कर पुर्ण झालेले आहे.(तुर्त चौकशीचे नाटक पुर्ण करण्यासाठी स्थगिती आहे.) अशा स्वरूपाचे काम जर सर्व सामान्य माणसाने केले असते तर इतक्यात तो जेलमध्ये गेला असता. या पूर्वीचे दुसरे भयंकर उदाहरण म्हणजे प्रभादेवी येथील **सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टकडे** भक्तांनी दिलेल्या करोडो रुपयांच्या रकमा देखील लोकप्रतिनिधींनीच आपल्या तथाकथित संस्थांकडे देणगी रूपाने लाटल्या. आणि हे प्रकरण शेवटी मा. हायकोर्टाच्या आदेशाने उजेडात आले. ह्याहीपुढे कहर म्हणजे राज्यातील अनेक **महत्वाचे टोलनाके** कंत्राटदारांची मुदत संपली असताना देखील त्यांना बेकायदेशीर मुदतवाढ देऊन वर्तमानपत्रात जाहीरात न देता, मागच्याच कंत्राटदारांचे कंत्राट कायम ठेवून करोडो रुपयांचा खुलेआम भ्रष्टाचार संबंधितांनीच घडवून आणलेला आहे. कवडी मोलाच्या किमतीने राज्यातील अनेक गोरगरीब शेतकऱ्यांच्या **हजारो एकर जिरायत जमिनी बेनामी नावांवर अगोदर खरेदी करून** त्या ठिकाणी नियोजन करुन शासकीय प्रकल्प आणले गेले व गरीब शेतकऱ्यांना खुलेआम देशोधडीस लावले. सत्ताधारी आणि विरोधी कोणीही ह्यावर भाष्य करायला तयार नाहीत, कारण सत्ताधारी व विरोधी दोघेही ह्या देशद्रोही सदृष्य कारस्थानात सामिल आहेत.

केंद्र व राज्य सरकार यांची भूमिका सहकाराविषयी अत्यंत चमत्कारीक, अन्यायधारक व आपले संबंधीत

ठराविक लोक डोळयासमोर ठेवून राहिलेली आहे. **सहकार कायदयाचे कलम ५० ते ६३ जर अभ्यासले** तर आपल्या लक्षात येईल की, राज्यशासनाची सहकारी संस्थांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भागिदारी करण्याची, निधी पुरविण्याची, सहाय्य करण्याची भूमिका ही दुटप्पीपणाची आहे. **राज्यातील बँका व पतसंस्था यांना लक्ष करुन** केवळ **सहकारी साखर कारखान्यांना मदत करण्याची भुमिका व कृती महाराष्ट्र राज्याला आर्थिकदृष्टया लुटणारी ठरलेली आहे**. केंद्र सरकार, नाबार्ड व राज्य सरकार यांनी साखर कारखान्यांना दिलेली आतापर्यंतची सर्व पॅकेजेसच्या रकमा एकाही शेतकऱ्याच्या थेट हातात दिल्या नाहीत. साखर कारखान्यात सत्ता असणाऱ्या संचालक मंडळाला हजारो कोटी रुपयांची शासकीय अनुदाने, कमी व्याजदरात कर्ज पुरवठा हा जनतेच्या पैशातून भरलेल्या तिजोरातूनच करण्यात आलेला आहे. **साखरेचे भाव १३ रुपयांवरुन ४८ रुपयांपर्यंत गेले. परंतु शेतकऱ्याना ऊसाचा भाव ८०० ते ९०० रुपयांवरुन केवळ २२०० रुपयांपर्यंत दिला**. हे विषम आर्थिक तत्व सर्वसामान्य जनतेला / शेतकऱ्याला समजलेच नाही. आणि ज्यांना समजले ते सरकारच्या विरोधामध्ये कोर्टात गेले नाहीत, कारण दुसऱ्या आर्थिक लाभाच्या प्रकरणात तेही सामील झालेले आहेत. अन्यथा जवळ जवळ **४ पटीने साखर कारखानदाऱ्यांना साखर विक्रीतून मिळाले परंतु शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव देताना अडीच पटीपेक्षा जास्त दिला नाही.** हे गणित सत्ताधारी व विरोधी लोकप्रतिनिधी यांनी एकत्रितपणे कटकारस्थान करून जनतेपासून दडवून ठेवले. जादा भावाने साखर सर्व सामान्य जनतेला विकून प्रत्येक साखर कारखान्याने शेकडो करोडो रूपये दरोडा टाकल्यासारखे जनतेच्या खिशातून अक्षरशः लुटले. ह्या सर्वांना **विरोधकांनी ठरविले असते तर, खंडणीसारख्या गुन्ह्याखाली मोक्का कायद्यान्वये जेलमध्ये जावे लागले असते.** परंतु हे झाले नाही. व भविष्यात येथुन पुढे होईल असे चित्र दिसत नाही. अपवादाची लोक वाट पाहात आहेत.

१९६० च्या सहकारी कायदयाप्रमाणे सहकारी संस्था तोटयात गेल्यास, अवसायानात गेल्यास आणि / किंवा त्या संस्थेत जाणीवपूर्वक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचे आढळल्यास संचालक मंडळ जेलमध्ये पाठवून त्यांची स्थावर - अस्थावर मालमत्ता जप्त करून विक्रि करेपर्यंत सहकार कायद्यात तरतुदी आहेत. परंतु The Representation of the People Act, 1950 हा जो लोकप्रतिनिधिंसाठीचा कायदा आहे त्यामध्ये कुठेही लोकप्रतिनिधिंवर सहकारी कायद्याप्रमाणे कारवाई करण्याची तरतुद नाही. आणि हेच मुळ कारण भ्रष्टाचाराचे आहे. **शिवाय १९६० चा सहकार कायदा व १९८४ चा मल्टीस्टेट को - आप. सोसायटीज् ॲक्ट मध्ये संचालकांची अपात्रता, पदावरून दूर करण्याची तरतूद व दोषी ठरविण्यासाठी असलेली कलमे लोकप्रतिनिधी कायद्यात समाविष्ठ करून सर्वांना समान न्याय देण्याची भुमिका स्विकारणे भारत्च्या संविधानात समाविष्ठ केलेले आहे.**

पतसंस्था जर तोट्यात गेली, ठेवीदारांच्या ठेवी वेळेत परत केल्या गेल्या नाहीत तर संचालक मंडळ देशोधडीला लागेपर्यंतची तरतुद सहकार कायद्यामध्ये आहे. व तीच तरतुद सहकारी साखर कारखान्यांसाठी लागु आहे. परंतु राज्यातील हाताच्या बोटावर मोजण्याएवढे साखर कारखाने सोडले तर ९५ टक्के **साखर कारखाने स्थापनेपासून ५० -५० वर्षे तोट्यातच आहेत. शेतकऱ्यांच्या ठेवी व त्यावरील व्याज सुध्दा वर्षानुवर्षे दिलेले नाही**. परंतु राज्यातील एकाही सहकारी साखर कारखान्यांचे संचालक मंडळ ह्या कारणास्तव बरखास्त करून व त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेला नाही आणि ही कृती भारताच्या संविधानाच्या विरोधात आहे.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४ मध्ये ''**कायद्यापुढे समानता**'' या विषयी अग्रहक्काने स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की ''**राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्यापुढे संरक्षण नाकारणार नाही.**'' संविधानाच्या अनुच्छेद १३ मध्ये मुलभुत हक्कांशी

विसंगत असलेले न्युनीकरण करणारे कायदे समाप्त करण्याच्या विषयी स्पष्ट भुमिका मांडलेली आहे. कारण देशातील प्रत्येक नागरिकास संविधानाने प्रदान केलेले हक्क जर कुठल्याही कृतीने हिरावून घेतले जात असतील तर, असा कायदा अमलात आणला जाणार नाही असे स्पष्ट म्हटलेले आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३८ - ३९ मध्ये '' **लोक कल्याणाच्या संवर्धनासाठी समाज व्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी तसेच प्रत्येक नागरिकाला न्याय मिळविण्याची संधी नाकारली जाणार नाही** '' याची शाश्वती देणारा कायदा वापरण्याची जबाबदारी राज्य सरकारवर ठेवलेली आहे. याहीपुढे भारताच्या संविधनाच्या अनुच्छेद २३ मध्ये तर '' **माणसाच्या अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आलेली आहे**''

परंतु वरील सर्व बाबींवरून आपल्या एक लक्षात येईल की, **भारताचे संविधान हे संपुणे भारत देश सार्वभौम घडविण्यासाठी, सामाजिक, आर्थिक न्याय मिळणेसाठी, संधीच्या समानतेसाठी व प्रामुख्याने व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता याचे आश्वासन देणारी बंधुता याने गुंफलेली जगातील सर्वोत्कृष्ट संकल्पना आहे.** भारताचे संविधान फार मोठ्या कष्टाने, अभ्यासपुर्वक व संपुर्ण देश एकसंघी राहावा आणि त्यासाठी कुठलीही रक्तरंजीत क्रांती होवू नये व मानव जातीला कलंक लागू नये असा विशाल दृष्टीकोन ठेवून **महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढाकाराने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा एवढा अमोल ठेवा आपल्या सर्वांसाठी उपलब्ध केलेला आहे**. त्याची मात्र आपण कसी विल्हेवाट लावली व ह्या सर्वाचे आपण कसे साक्षीदार आहोत याची आपणा प्रत्येकास चांगली माहिती आहे. सत्ता आणि पैशाचा दुरूपयोग आता तत्वाच्या गोष्टी सांगण्यासाठी केल्या जात आहेत. आणि लोक हे निमुटपणे सोईस्करपणे मान्य करतानाच दिसतात. यासारखी शोकांतिका कुठली दुसरी असू शकत नाही. परंतु तो दिवस सुध्दा लांब नाही की ज्यांनी संविधान सुध्दा पायदळी तुडवले, राज्यातील सर्व कायदे कोळुन प्यायले, हजारो करोडो रूपयांची माया अवैध मार्गाने जमा केली, त्याचा पर्दापाश होईलच व त्याचे भोग संबंधीतांना भोगावे लागतीलच, एवढी ताकद घटना शिल्पकाराच्या संविधानात आहे, यावर आमचा विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!